स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२४–२५/१७ दि. २९/०४/२०२४

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : राष्ट्रीय सेवा योजनेतंर्गत स्वयसेवकांची यशोगाथा पाठविण्याबाबत
**(A Success Story Book of NSS Volunteers)**

महोदय,

मा. राज्यसपंर्क अधिकारी, रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांच्या पत्रानुसार राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांमध्ये सामाजीक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय मुल्ये संस्कारित करणारी सुपिक जमीन आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक ही विधायक शक्ती आहे. देशाच्या समृध्दीचे वाहक म्हणुन युवकांची कामगिरी खूपच महत्वाची असते. राष्ट्रीय सेवा योजनेत या युवकांची मूल्यात्मक कार्यानुभवाच्या पातळीवर सशक्त पायाभरणी केली जाते. रासेयो स्वयंसेवकांनी केलेले कार्य नैतिकदृष्ट्या व मूल्यात्मकदृष्ट्या विशेष महत्त्वाचे आहे.

या अनुषंगाने त्यांच्यामार्फत होत असलेल्या कार्यास प्रातिनिधिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आपल्या महाविद्यालयातील कार्यरत असलेल्या रासेयो स्वयसेवकांची स्वलिखीत यशोगाथा सुवाच्छ अक्षरात तसेच योग्य त्या कागदपत्रे/पुरावे व छायाचित्रांसह मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी यांच्यामार्फत दि. ०३ मे २०२४ पर्यंत रासेयो कार्यालयास जमा करावी. तसेच nss_student_list@pun.unipune.ac.in या मेलवर Soft Copy (PDF) स्वरूपात (विषय: **A Success Story Book of NSS Volunteers** या विषयासह) पाठविण्यात यावी. स्वयसेवकांची यशोगाथा कहाणी राष्ट्रीय सेवा योजनेत कार्यरत असताना आलेल्या अविस्मरणिय प्रसंगाची असावी व साधारणता १००० शब्दांची असणे अपेक्षित आहे. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. राज्यसपंर्क अधिकारी, रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचे पत्र

मंत्रालयीन सेवा

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार इमारत, दालन क्र. ४१६,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
ई -मेल-nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र -०२२..२२६७९५६५

क्रमांक: रासेयो-२०२३/प्र.क्र.८० /रासेयो कक्ष दिनांक : २९ एप्रिल, २०२४

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
**सर्व रासेयो संचलित विद्यापीठे/ संचालनालये**

**विषय : राष्ट्रीय सेवा योजनातंर्गत स्वंयसेवकांची यशोगाथा पाठविण्याबाबत ( A Success Story Book of NSS Volunteers )**
संदर्भ : क्र. रासेयो - २०२२/ प्र.क्र.८०/ रासेयो कक्ष, दि.१९ जानेवारी, २०२३

उपरोक्त विषयास अनुलक्षून कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांमध्ये सामाजीक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय मुल्ये संस्कारित करणारी सुपिक जमीन आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वंयसेवक ही विधायक शक्ती आहे. देशाच्या समृध्दीचे वाहक म्हणुन युवकांची कामगिरी खूपच महत्वाची असते. राष्ट्रीय सेवा योजनेत या युवकांची मूल्यात्मक व कार्यानुभवाच्या पातळीवर सशक्त पायाभरणी केली जाते. रासेयो स्वंयसेवकांनी केलेले कार्य नैतिकदृष्टया व मूल्यात्मकदृष्टया विशेष महत्वाचे आहे. याअनुषंगाने त्यांच्यामार्फत होत असलेल्या कार्यास प्रातिनिधिक व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विद्यापीठातंर्गत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेत कार्यरत असणा-या स्वंयसेवकांची लेखी स्वरुपातील यशोगाथा पाठविण्या बाबत आपणास कळविण्यात येत आहे.

सर्व विद्यापीठांनी त्यांच्या अंतर्गत महाविद्यालयातून जिल्हानिहाय यशस्वी राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवकांची लेखी स्वरुपात यशोगाथा तसेच छायाचित्रे दि. ०५ मे, २०२४ पर्यत या कार्यासनास ई-मेल व्दारे पाठविण्यात यावीत. राष्ट्रीय सेवा योजनेत कार्यरत असताना स्वंयसेवकांना अनेक अविस्मरणिय प्रसंगाना सामोरे जावे लागते त्या प्रसंगातूनच यशोगाथा तयार होत असते. स्वंयसेवकांची यशोगाथा कहाणी साधारणता १००० शब्दांची असणे अपेक्षित आहे.

**(डॉ. निलेश मो. पाठक)**
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना,महाराष्ट्र शासन.